(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / VOL. XII / Issue- II ISSN 2277-8063

# सत्यशोधक : गुरुवर्य शामराव देसाई

**डॉ. दीपक पाटील,** कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कोवाड ता. चंदगड, जि. कोल्हापूर

---

**जीवन परिचय :**

शामराव देसाई यांचा जन्म 4 मे 1895 रोजी येळूर (बेळगांव) येथे झाला. आईचे नांव उमाबाई वडील गोविंदराव इडलहोंड (खानापूर) येथे 'गुरुचरित्र' वाचीत असताना गुरुचरित्र वाचण्याचा शुद्रांना अधिकार नाही म्हणून एका ब्राह्मणाकडून झालेला अपमान त्यांच्या पुढील आयुष्याच्या वाटचालीस कलाटणी देणारा ठरला. शामराव 1915 साली मुलकी परीक्षा पास झाले. 1916 साली त्यांचा विवाह कागणी (ता. चंदगड) गावाच्या लोडोबा रावजी देसाई च्या कन्येशी (शांताबाई) झाला. 1917 साली झपात्रा नांदूरकर यांच्या मुलीचे सत्यशोधकी विचारप्रणाली प्रमाणे येळ्ळूर येथे लग्न लावले. शिक्षक म्हणून कामावर असताना 1920 साली समाजकार्यासाठी राजीनामा दिला. 9 मे 1921 रोजी भुजंगराव दळवी (जिल्हा न्यायाधिश) यांच्या सहकार्याने शिवजयंतीला राष्ट्रवीर साप्ताहिकाची स्थापना केली. आणि 1960 पर्यंत संपादकाची जबाबदारी सांभाळली. 1926 साली पहिली सत्यशोधक परिषद शामराव गुरुजींच्या अध्यक्षतेखाली करवीर इलाख्यात घेण्यात आली. जिल्हा शेतकरी शिक्षक समितीची स्थापना करुन 1941 ते 1956 पर्यंत 281 प्राथमिक शाळा, प्रौढ शाळा, दोन हायस्कूल बेळगांव, खानापूर, चंदगड, नंदगड भागामध्ये काढली. 1942 मध्ये दि मराठा को. ऑफ. क्रेडिट सोसायटीची स्थापना केली. तसेच जयहिंद मील शहापूर येथे काढली. 1952 मध्ये गर्लगुंजी येथे स्त्रियांच्या समाजशिक्षण क्लासची स्थापना केली. 4 डिसेंबर 1971 रोजी गुरुजींचे निधन झाले.

श्यामराव देसाई यांनी आपले सारे आयुष्य समाज सुधारणेसाठी वाहून घेतले. निरपेक्षवृत्तीने समाज हिताची दृष्टी ठेवून बहूजन समाज जागृतीचे कार्य केले. आपल्या स्पष्ट आणि निर्भीड वाणीचा तसेच आपल्या प्रभावी लेखणीचा जनसेवेसाठी, सत्यशोधक विचारासाठी आणि प्रसारासाठी वापर केलेला आहे.

**सत्यशोधक पुरोहित :**

कोल्हापूरात ब्राह्मण पुरोहितानी लादलेल्या धार्मिक गुलामगिरी विरुध्द मोठी चळवळ शाहू महाराजांच्या प्रेरणेने चालू होती. भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे, बाबुराव यादव, मामासाहेब खानविलकर यानी सत्यशोधक विचारानुसार आपले धार्मिक विधी बहुजन पुरोहितामार्फत करण्याचे काम सुरु केले. त्यासाठी भास्करराव जाधवानी 'घरचा पुरोहित' नावाची छोटेखानी पुस्तिकाही तयार केली होती. शाहू महाराजानी 'शिवाजी वैदिक स्कूल' ची स्थापना करुन पुरोहित प्रशिक्षण सुरु केले. याचा परिणाम महाराष्ट्र भर होवू लागला. कोल्हापूर संस्थानला लागून असलेल्या वेळगावातील बहुजन समाजावर मोठा परिणाम विशेषतः शामराव देसाई यांच्यावर झाला होता.

आपली धार्मिक कार्ये आपणच करावीत. 'सर्व साक्षी जगतपती त्याला नकोच मध्यस्थी' हा विचार महात्मा फुलेनी मांडला. या सत्यशोधक विचारांची पेरणी गुरुजीनी सुरु केली. बेळगांव, खानापूर, चंदगड, हुक्केरी, चिक्कोडी इत्यादी तालुक्यातून त्यांना पौरोहित्यासाठी बोलावणी येत. परंतू एक माणूस कुठवर पुरणार म्हणून त्यानी पुरोहित तयार करण्याचे वर्ग सुरु केले. भूमीपूजनापासून ते घरप्रवेशापर्यंत, लग्न, सत्यनारायण, इत्यादी धार्मिक कार्ये कशी करावीत इत्यादी या वर्गातून शिकविले जाई. त्यासाठी लागणारे मंत्र, मंगलाष्टके, आशीर्वचने इत्यादी बऱ्याच गोष्टी त्यांनी स्वतः रचल्या. बहिर्जी शिरोळकर यांनीही हे कार्य सुरु केले. त्यासाठी पोथ्या तयार करुन, प्रसिध्द केल्या. त्यामुळे बहुजन समाजात हजारो पुरोहित तयार झाले. अल्पशा खर्चात बहुजन समाजाची धार्मिक कार्ये होवू लागली त्यामुळे होणारी लुबाडणोक व फसवणूक थांबली.

**राष्ट्रवीर :**

बहुजन समाजाच्या धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक दर्जा याबाबतीत मागासलेपणा, त्यांची असहाय्य केविलवाणी स्थिती, नशिबी आलं ते भोगावं ही मानसिकता, विधिलिखित चुकायचे नाही भोगलेच

पाहिजे ही परंपरागत वृत्ती. अज्ञानास बाहेर काढले पाहिजे. बहुजन समाजाची सुटका केली पाहिजे. वृत्तपत्र ही कोणत्याही चळवळीच्या प्रचाराची शक्ती आणि प्रभावी साधन असल्याने ‘राष्ट्रवीर’ साप्ताहिकाचा जन्म झाला.

9 मे 1921 रोजी शिवजयंतीच्या मुहूर्तावर श्री. भुजंगराव दळवी व श्री. शामराव देसाई यांनी राष्ट्रवीरची स्थापना केली . त्यासाठी त्यांनी कुरुंदवाड संस्थानाची नोकरी सोडली. राष्ट्रवीर हे ब्राह्मणेत्तर चळवळीचे सत्यशोधक चळवळीचे मुखपत्र व्हावे अशी भुजंगराव दळवींची इच्छा होती. राष्ट्रवीर जन्मापासून 1928 पर्यंत त्यानी लिखाणाची, मॅनेजर व उपसंपादकाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळून 1929 पासून संपादक पदाचा भार 1960 पर्यंत सांभाळला. ‘राष्ट्रवीर’ सत्यशोधक विचारांचे नि ब्राह्मणेत्तर चळवळीचे दक्षिण महाराष्ट्रातील हत्यार म्हणून गुरुजीनी वापरले. गुरुजींचा राष्ट्रवीरचा संबंध इतका मूलगामी होता की, बेळगांव परिसरात, दक्षिण महाराष्ट्रात गुरुजींना ‘राष्ट्रवीरकार देसाई’ म्हणूनच ओळखले जात होते. राष्ट्रवीरमधून गुरुजीनी केलेले लिखाण म्हणजे व्यासंग, तळमळ, चीड, निधडेपणा आणि चिकाटी. राष्ट्रवीर पत्र कोणत्याही संस्थानिकाची तरफदारी करणार नाही किंवा एखाद्या संस्थानातील अधिकाऱ्याविरुध्द विनाकारण बदनामी करणार नाही. ब्राह्मणेत्तरांचे धोरण सातत्याने मांडण्याचे काम राष्ट्रवीरच्या माध्यमातून गुरुवर्यानी केले. सभ्यतेस, संस्कृतीस सोडून एकही जाहिरात राष्ट्रवादी पत्रात येत नसे. वर्षातून दोन सुट्ट्याखेरीज अंक कधीच बंद ठेवण्यात आलेला नाही. अस्सल मराठेशाही वळणाची भाषा संस्कृती, मराठी बाणा राष्ट्रवीरने कायम टिकविला.

**मूर्तिपूजेचा विरोध :**

मूर्तिपूजेच्या अवडंबरावरही गुरुवर्यानी टिका केली. मूर्तिपूजा, नवसायास आदी गोष्टी हे पुरोहितानी बहुजन समाजाला लुबाडण्यासाठी निर्माण केलेले थोतांड असल्याचा विचार ते अनेक सभामधून मांडत. एखाद्या देवळाच्या देवीच्या नाकातील किंमती नथ चोरिला जातो त्यावेळी ‘देवी झोपली होती काय?’ असा सवाल ते करत. तसेच मुसलमान आक्रमकानी हजारों देव देवतांची विटंबणा झाली, मूर्तीचा चुराडा झाला तेंव्हा त्यांचे काही वाकडे झाले नाही. किंवा त्यांचे आक्रमण का थांबले नाही? असा ऐतिहासिक दाखला देत मूर्तीमधील कुचकामीपणा स्पष्ट करत.

**समतावादी विचार :**

गुरुवर्य शामराव देसाईनी सत्यशोधक तत्वाचा प्रसार करीत असताना दलित-पतिताना आपलेसे केले. दलितांच्या वस्त्यात जाऊन त्यांच्या अनेक धार्मिक समारंभात ते उत्साहाने भाग घेत. त्यांच्याच पंगतीत बसून जेवण खाणं घेत. त्यांच्या वस्त्यात सभा घेत. मागासलेल्या मराठ्याना जो उपदेश करत तोच त्याना सांगत तुम्हीही आमच्याप्रमाणे माणसे आहात. तुमचे हक्क आमच्याइतकेच आहेत हा राजर्षी शाहूंचा दलितासंबंधीचा विचार ते महार – मांगांच्या वाड्यापर्यंत पोहचवित. अनेक ठिकाणची मंदिरे व पाणवटे त्यांनी दलित समाजास खुली करुन दिली.

**मा. फुलेंचे सच्चे अनुयायी :**

बेळगांव विभागात सत्यशोधक समाज आणि ब्राह्मणेत्तर पक्ष यांचे कार्य एकोप्याने सुरु होते याचे श्रेय श्यामराव देसाई यांचे आहे. ब्राह्मणेत्तर समाजाला समर्थ स्वाभिमानी बनवावयाचे असेल तर एका बाजूने धार्मिक, जातीय गुलामगिरितून बहूजन समाजाला मुक्त केले पाहिजे तसेच दुसऱ्या बाजूने आर्थिक आणि राजकीय गुलामगिरीतून मुक्त केले पाहिजे. ही महात्मा फुलेंची शिकवण होती. महात्मा फुलेंच्या शिकवणीचे मूळ गुरुजीनी ओळखले होते. बहुजन समाज अज्ञान, अंधश्रध्दा यांच्या विळख्यातून मुक्त व्हावा यासाठी त्यानी तळमळीने कार्य केले.

उन्हाळा असो की पावसाळा बहिर्जी शिरोळकरांबरोबर गावा-गावात रात्री सभा घेत. प्रारंभ पोवड्याने होई त्यानंतर गुरुजी सांगत. ‘बाबानो ! मुला-मुलींच्या लग्नासाठी सावकाराची कर्जे काढू नका. लग्नात व लक्ष्मी यात्रेत वारेमाप खर्च करु नका. देवाला कोंबडे-बकरे लागत नाही. त्याला भक्ती पुरेशी होते. तुमचा संसार उध्वस्त करणारी दारु सोडा. तुमच्या मुलांना शाळेत पाठवा त्यांना शिकू द्या.’

लक्ष्मी म्हणजे खेड्यातील लोकांच्या मते मोठी कोपिष्ट देवता. लोकांचाही तिच्याप्रती मोठा भितीयुक्त भक्तिभाव. लक्ष्मी यात्रेमुळे शेतकरी कर्जाच्या गर्तेत पडत होता. तेंव्हा लोकांना शहाणा करण्यासाठी गुरुजी प्रश्न

विचारतात 'लक्ष्मीच्या यात्रेपासून गावातील पीडा बाजूला होते. देवी रोगराई कमी करते. मग सुधारलेल्या राष्ट्रात लक्ष्मी यात्रा का होत नाहीत? लक्ष्मी जर माणसाची आई तर ज्यांना बळी दिला जातो त्या कोंबड्या, बकऱ्याची ती कोण?

बहुजन समाजातील अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा व अनिष्टप्रथा यांवर हल्ले चढवून समाज जागृती करणे हे सत्यशोधक समाजाचे एक प्रमुख कार्य होते. आपल्या भाषणातून व राष्ट्रवीरच्या अग्रलेखातून लोकांच्या अंधश्रध्दांचे वाभाडे काढण्याचे अप्रिय कार्य त्यानी आयुष्यभर केले. म. फुलेंच्या सत्यशोधक विचारांचे पाईक म्हणून ते जगले.

**संदर्भ :**

1] राष्ट्रवीरकार शामराव देसाई जीवन आणि कार्य डॉ. जयसिंगराव पवार

2] गुरुवर्य शामराव देसाई : भक्ती आणि कार्य प्रा. राम नांदूरकर

3] राजर्षी शाहू छत्रपती स्मारक ग्रंथ : महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी

2 मे 1933

11 फेब्रुवारी 1936

17 आगस्ट 19374] राष्ट्रवीर साप्ताहिक 13 जानेवारी 1950

17. फेब्रुवारी 1950

1 डिसेंबर 1950

4 मार्च 1955

3 आगस्ट 1956

9 नोव्हेंबर 1956

9 नोव्हेंबर 1958

5] राजर्षी शाहू धनंजय कीर

6] महात्मा डॉ. रविंद्र ठाकूर

7] शाहू महाराज आठवणी - भाई माधवराव बागल

8] महात्मा फुले समग्र वाड्मय – धनंजय कीर

स.ग. मालशे